**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**कार्यपत्रिका क्र. ५**

**सभावृत्तांत**

दिनांक :- १६/०२/२०२१ वेळ :- सकाळी ११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक १२/०२/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.सुरेश शिवाजी भोईर - अध्यक्ष
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
३. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
४. मा. माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.सचिन बाजीराव चिंचवडे
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे
८. मा.राजेंद्र तानाजी गावडे
९. मा.विनोद जयवंत नढे
१०.मा.संतोष अंकुश कोकणे
११.मा.बिभीषण बाबु चौधरी
१२.मा.विठ्ठल बबन भोईर

याशिवाय क्षेत्रीय अधिकारी श्रीमती सोनम देशमुख, श्री.प्रशांत पाटील – कार्यकारी अभियंता,स्थापत्य, श्री.चंद्रशेखर धानोरकर – उपअभियंता,स्थापत्य, श्री.उमेश मोने – कनिष्ठ अभियंता, श्री.करपे डी आर – उपअभियंता , बांधकाम परवानगी, श्रीमती मोमीन झेड आय – उपअभियंता, झोनिपु स्थापत्य,अमोल कानडे – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री.पारोल के.बी- मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.नितीन देशमुख – कार्यकारी अभियंता, विद्युत, श्री.अकबर शेख- उपअभियंता, विद्युत इत्यादी उपस्थित होते

----------

**मा. सभापती**– सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

दिनांक ०५/०१/२०२१ रोजीचा (कार्यपत्रिका क्र.०४) सभावृत्तांत कायम करणेत आला.

ठराव क्र. ७ विषय क्र. १

दि. १२ /०२/२०२१

सुचक : मा. विनोद नढे अनुमोदक: मा.राजेंद्र गावडे

संदर्भ :- मा. विनोद नढे यांचे दिनांक २२/०१/२०२१ चे पत्र

मा.विनोद नढे यांचे दिनांक २२/०१/२०२१ चे पत्रानुसार विजयनगर अल्फान्सो रोड येथील चौकास नथु नढे कॉर्नर असे नामकरण देण्याबाबत ठराव मांडण्यात आला आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

ठराव क्र. ८ विषय क्र. २

दि. १२ /०२/२०२१

सुचक : मा. विनोद नढे अनुमोदक: मा.करुणा चिंचवडे

संदर्भ :- मा. विनोद नढे यांचे दिनांक २७/०१/२०२१ चे पत्र

मा.विनोद नढे यांचे दिनांक २७/०१/२०२१ चे पत्रानुसार विजयनगर पवनानगर येथील चौकास भोईर चौक व भोईर कॉर्नर असे दोन नामफलकाचे बोर्ड बसविण्याबाबत ठराव मांडण्यात आला आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

ठराव क्र. ९ विषय क्र. ३

दि. १२ /०२/२०२१

सुचक : मा. करुणा चिंचवडे अनुमोदक: मा. अश्विनी चिंचवडे

संदर्भ :- मा.करुणा चिंचवडे यांचे दिनांक ३/०२/२०२१ चे पत्र

मा.करुणा चिंचवडे यांचे दिनांक ३/०२/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१७ मधील चिंचवड ते रावेत या मार्गावर ३४.५० मीटर या रस्त्याचे काम सध्या पुर्णत्वाकडे असुन वाल्हेकरवाडी आणि रावेत ला जोडणारा वाल्हेकरवाडी सीमेवरील पुलास राजमाता जिजाऊ ब्रिज असे नाव देणेत यावे अशी समस्त वाल्हेकरवाडी ग्रामस्थांची मागणी असुन सदर विषयास मान्यता देऊन सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता मंजुर करणेबाबत ठराव मांडणेत आला आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

ठराव क्र. १० विषय क्र. ४

दि. १२ /०२/२०२१

सुचक : मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक: मा.राजेंद्र गावडे

संदर्भ :- मा.अश्विनी चिंचवडे यांचे दिनांक ४/०२/२०२१ चे पत्रानुसार

मा.अश्विनी चिंचवडे यांचे दिनांक ४/०२/२०२१ चे पत्रानुसार चिंचवड येथील केळकर घाटाच्या शेजारील रस्त्याला दीपक सुरेशकाका गावडे मार्ग असे नामकरण करणेबाबत सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेबाबत ठराव मांडणेत आला आहे..

सदरचा ठराव दप्तरी दाखल करण्यात येत आहे

----------

ठराव क्र. ११ विषय क्र. ५

दि. १२ /०२/२०२१

सुचक : मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक: मा.करुणा चिंचवडे

संदर्भ :- मा.अश्विनी चिंचवडे यांचे दिनांक ४/०२/२०२१ चे पत्रानुसार

मा.अश्विनी चिंचवडे यांचे दिनांक ४/०२/२०२१ चे पत्रानुसार चिंचवड येथील केळकर घाटाच्या शेजारील चौकाला दीपक सुरेशकाका गावडे चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेत

येऊन सदर सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत ठराव मांडणेत आला आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

**सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्र. १२ विषय क्र. ६
दि. १२ /०२/२०२१
सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक: मा.राजेंद्र गावडे
संदर्भ :- मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार,

मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार, सर्व्हे नं.८२ कोतवाल नगर किवळे या ठिकाणी भोंडवे चाळ म्हणुन वस्ती आहे. परंतु सदर ठिकाणी या कुटुंबांना ये जा करण्यासाठी वहिवाटीचा रस्ता होता. तो रस्ता मालकाने बंद केल्याने या कुटुंबांना ये जा करण्यासाठी रस्ता नाही. म्हणुन कुटुंबे पुर्ण अडचणीत असल्यामुळे त्वरीत दखल घेऊन महानगरपालिकेने कलम २०५ अंतर्गत (६ मीटर) रस्ता विकसित करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्र. १३ विषय क्र. ७
दि. १२ /०२/२०२१
सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक: मा.करुणा चिंचवडे
संदर्भ :- मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार,

मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार, सर्व्हे नं.७१ विकासनगर येथील दत्तनगर या भागात ओढयाच्या बाजुला ३० ते ४० कुटुंब एक दोन गुंठा जागा विकत घेऊन त्यावर बांधकाम करुन राहतात. परंतु सदर ठिकाणी (बालघरे वस्ती) उत्तरेच्या बाजुने सर्वांना कॉलनीच्या बाहेर जाण्यासाठी रस्ता होता. तो रस्ता मुळ जागा

मालकाने बंद केला आहे. त्यामुळे मागील बाजुस असणारे जागा मालक (लॅण्ड लॉक) झालेले आहेत म्हणुन महापालिकेने सदर (६ मीटर) रस्ता कलम २०५ अंतर्गत विकसीत करुन देणेस मुळ मालकाची संमती असल्याने सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्र. १४ विषय क्र. ७

दि. १२ /०२/२०२१

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक: मा.सुरेश भोईर

संदर्भ :- मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार,

मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार, सर्व्हे नं.७०/१ या ठिकाणी भीमाशंकर कॉलनी नं.२ असून सदर ठिकाणी उत्तरेच्या बाजूने सेंट जोसेफ शाळा आहे. व दक्षिणेच्या बाजूने भीमाशंकर कॉलनी नं.२ व पश्चीमेच्या बाजुने एकता कॉलनी पुर्व बाजूस भिंत आणि सदर रस्त्याच्या मधोमध एक धोकादायक विहीर आहे.

सदर विहीर हि कच-याने व टाकाऊ पदार्थाने भरलेली आहे. विहीरीस कुठल्याही प्रकारचे संरक्षण कठडे नाहीत. विहिरीच्या बाजुने २ फुटचा रस्ता आहे. सदर रस्त्याच्या बाजुला असलेल्या शाळेतील विद्यार्थी ये जा करत असतात. परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनी या रस्त्याचा ये जा करण्यासाठी वापर करत असतात.

शिवाय या विहीरीतील कचरा व गाळाने परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. सदरची विहीर नागरिक, महिला व मुलांसाठी धोकादायक झालेली असुन मुळ मालकाने विहिरीच्या बाजुचा रस्ता बंद केला असल्याने दोन्ही बाजूस एक दोन गुंठयाचे जागा मालक जवळ जवळ ८० ते १०० लॅण्ड लॉक झाले आहेत, म्हणुन सदरचा (६ मीटर) रस्ता महापालिकेने कलम २०५ अंतर्गत विकसीत करुन विहीरीच्या कठडयाचे बांधकाम करुन विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्र. १५ विषय क्र. ८

दि. १२ /०२/२०२१

सुचक :  मा.बाळासाहेब ओव्हाळ                                    अनुमोदक: मा.सुरेश भोईर
संदर्भ :- मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार,

मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचे दिनांक ५/०२/२०२१ चे पत्रानुसार सर्व्हे नं.९० येथील गायकवाड वस्ती किवळेगाव या ठिकाणी मुळ मालक नितीन गायकवाड व इतर यांनी सदर ठिकाणी ४० ते ५० कुटुंबाचा वहिवाटीचा रस्ता बंद केल्याने सदर जागेचे मालक लॅण्ड लॉक झाले आहेत.     त्यांचा रस्ता बंद झाला आहे, म्हणुन महापालिकेने सदर रस्ता कलम २०५ अंतर्गत विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्र. १६                                    विषय क्र. ९
दि. १२ /०२/२०२१
सुचक :  मा.मोरेश्वर भोंडवे                                    अनुमोदक: मा.सुरेश भोईर
संदर्भ :- मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ११/०२/२०२१ चे पत्रानुसार,

मा.मोरेश्वर भोंडवे यांचे दिनांक ११/०२/२०२१ चे पत्रानुसार मौजे रावेत येथील सर्व्हे नं.१८६ मधुन १८ मी.रस्ता करण्यासाठी मा.ब प्रभाग समिती ठराव क्र.३१ दि.१६/११/२०१८ रोजी अन्वये ठराव मंजुर झालेला आहे, मात्र सदर नियोजित रस्त्याच्या ठिकाणी रस्ता करण्यास नागरिकांचा विरोध आहे या शिवाय रस्त्याच्या ठिकाणी मोकळी जागा असून लोक वस्ती नाही, यामुळे सद्या सदर रस्त्याची आवश्यकता वाटत नाही.  तरी सदर स.नंबर १८६ मौजे रावेत येथील जागेतुन कलम २०५ अन्वये घोषित करावयाचे रस्त्याचे प्रकरणी पुढील कार्यवाही सद्य स्थितीत करण्यात येवु नये व कायमस्वरुपी रद्द करण्यात यावा या ठरावास मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

----------

ठराव क्र. १७                                    विषय क्र. १०
दि. १२ /०२/२०२१
सुचक :  मा.सुरेश भोईर                                    अनुमोदक: मा.राजेंद्र गावडे
संदर्भ :- मा.सुरेश भोईर यांचे दिनांक ११/०२/२०२१ चे पत्र

मा.सुरेश भोईर यांचे दिनांक ११/०२/२०२१ चे पत्रानुसार एम्पायर इस्टेट पुल ते काळेवाडीचा पुल यामधील नदीच्या कडेने जाणा-या १८ मीटर रस्त्याला पवना नेकलेस रोड असे नामकरण करणेबाबत ठराव मांडणेत आला आहे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर विषयाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

ठराव क्र. १८ विषय क्र. ११
दि. १२ /०२/२०२१
सुचक : मा.संतोष कोकणे अनुमोदक: मा.विनोद नढे
संदर्भ :- मा.संतोष कोकणे यांचे दिनांक १२/०२/२०२१ चे पत्र

मा.संतोष कोकणे यांचे दिनांक १२/०२/२०२१ चे पत्रानुसार प्र.क्र.२२ काळेवाडी येथील

१) श्रीकृष्ण कॉलनी क्र.१ येथील रस्त्याला कै.महमदसाहब जाफर लंगोटी मार्ग असे नामकरण करण्यात यावे.
२) श्रीकृष्ण कॉलनी क्र.१ येथील कोकणेनगर येथील चौकाला स्व.सचिन कळकुंबे असे नामकरण करण्यात यावे.

( मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचे पत्र क्र.भुजि/९/कावि/२२३/२०२० दिनांक २३/०९/२०२० अन्वये प्रभाग कार्यालयांतर्गत असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नावे देण्याबाबत स्वतंत्र धोरण निश्चीत करण्यात येणार आहे, तरी सदर धोरण निश्चीत होईपर्यंत सदर विषयास मान्यता देता येणार नाही.

----------

ठराव क्र. १९ विषय क्र. १२
दि. १२ /०२/२०२१
सुचक : मा.बिभीषण चौधरी अनुमोदक: मा.राजेंद्र गावडे
संदर्भ :- मा.बिभीषण चौधरी यांचे दिनांक ११/०२/२०२१ चे पत्र

मा.बिभीषण चौधरी यांचे दिनांक ११/०२/२०२१ चे पत्रानुसार प्रभाग क्र.१६ व १७ वा प्रभागातील मामुर्डी ते प्रेमलोक पार्क या १० किलोमीटरच्या दोन्ही प्रभागात स्ट्रीट लाईटची दुरुस्तीची कामे करण्यासाठी एकच वाहन उपलब्ध असल्यामुळे एखाद्या विभागातील बिघाड झाला तर त्या भागात आठ दिवसांनीच दुरुस्ती येते असे विद्युत विभागातुन सांगण्यात येते. सदर विद्युत विभागाची अडचण व कामांस होणारा विलंब व नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी आपण आणखी वाहन (हैड्रोलिक) उपलब्ध करुन देणेस तसेच उद्यान विभागासही झाडांच्या फांद्या छाटणीसाठीची गाडीची आवश्यकता असल्याने हायड्रोलिक गाडी ब प्रभागासाठी देणेस मान्यता देणेत येत आहे.

**सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.**

---------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[सुरेश शिवाजी भोईर]
सभापती
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/७२/२०२१.
दिनांक : २३/०२/२०२१

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना